पुण्यश्लोकअहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७१ / ७२/ ७३ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: http://sus.ac.in ई-मेल: registrar@sus.ac.in/fao@sus.ac.in

NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA 2.96)

**खरेदी व भांडार विभाग**

जा.क्र.पुअहोसोविसो/कु.का./२०२६/6093 दिनांक: 1 JUL 2026

# परिपत्रक

प्रस्तुत विद्यापीठातील सर्व संकुले/प्रशासकीय विभाग व संबंधितांना कळविण्यात येते की, आपल्या विभागाकडे असणाऱ्या विविध प्रिंटरच्या टोनर रिफिलींगसाठी व टोनर दुरुस्तीच्या कामासाठी न्युनतम दर असलेली फर्म में. डेल्टा सर्व्हिसेस, सोलापूर यांच्याशी मा. कुलगुरु महोदय यांच्या मान्यतेने एक वर्षाच्या कालावधीसाठी दि. ०१/०७/२०२६ ते ३०/०६/२०२७ पर्यंत वार्षिक दर करार करण्यात आलेला आहे. विविध प्रिंटरच्या टोनर रिफीलिंगसाठी व टोनर दुरुस्तीच्या कामासाठी मंजुर दर खालील प्रमाणे आहेत.

| Sr. No. | Name of the Article | Quantity | Rate Rs. Per Qty. |
|---|---|---|---|
| 01 | Canon 2900 Toner Refilling | 120 gm. | 243/- |
| 02 | HP LaserJet 1020 Toner Refilling | 120 gm. | 243/- |
| 03 | HP LaserJet 1005 Toner Refilling | 80 gm. | 243/- |
| 04 | Samsung ML 1640 Series | 80 gm. | 220/- |
| 05 | Canon MF 244 d w | 80 gm. | 243/- |
| 06 | Brother MFC B7715 DW | 120 gm. | 243/- |
| 07 | Blade Replacement | 01 Qty | 142/- |
| 08 | Drum Replacement | 01 Qty | 200/- |
| 09 | PCR Replacement | 01 Qty | 120/- |
| 10 | Magnetic Rod Replacement | 01 Qty | 135/- |

सर्व संकुल व प्रशासकीय विभाग प्रमुखांना आदेशान्वये सुचित करण्यात येते की, उपरोक्त टोनर रिफिलींग व टोनर दुरुस्ती करण्यापूर्वी संबंधित समान लेखा संहितानुसार सक्षम प्राधिकाऱ्यांची प्रशासकीय मान्यता घेवुन सदर फर्मला करारातील अटी व शर्तीच्या अधिन राहून पुरवठा आदेश द्यावा. व काम पुर्ण करुन घ्यावे. तसेच फर्मने टोनर रिफिलींग व टोनर दुरुस्तीचे काम समाधानकारक पूर्ण केल्यानंतर प्राप्त देयकास Accession & Allotment करुन व सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेवून तीन दिवसांत देयक अदायगीसाठी या विभागाकडे सादर करावे जेणे करुन सदर फर्मला देयकाची रक्कम वेळेत आदा करणे सोईचे होईल. दर कराराव्यतिरिक्त इतर फर्मकडून उपरोक्त काम केल्यास देयके पारीत करण्यात येणार नाहीत.

(डॉ. अतुल लकडे)
प्र-कुलसचिव

पत्ता:-
**डेल्टा सर्विसेस,**
शॉप नं. जी -१२, श्रध्दा इमराल्ड,
गांधीनगर, अक्कलकोट रोड,
**सोलापूर -४१३००६**
**मो. नं. ८९९९०८२८९१ | ९९२२९५९९२२**

प्रति,
१. सर्व प्रशासकीय विभाग
२. सर्व संकुले
३. मा. कुलगुरु कार्यालय
४. मा. प्र.कुलगुरु कार्यालय
५. मा. कुलसचिव कार्यालय
६. वित्त व लेखा विभाग परिपत्रक नस्ती

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2026 ◑ 85AB 974444

सोलापूर अ.क्र. 90 3604 दिनांक- 2 5 JUN 2026

श्री.- डेल्टा सर्व्हिस

यांनी रुपये १००/- चा जनरल स्टॅम्प मागितलेवरुन

हा रुपये १००/- चा स्टॅम्प दिला.

श्री. एम. एन. बल्ला

मुद्रांक विक्रेता, जिल्हा न्यायालय आवार, सोलापूर.

परवाना क्र. इ.एस.टी./१९९० कोड नं.- २५०१०३०

कोषागार कार्यालय सोलापूर

19 JUN 2026

मुद्रांक प्रमुख लिपिक / उपकोषागार

**करारनामा**

**(१ वर्षाकरीता)**

**लिहून घेणार:-**
प्र.कुलसचिव,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर,
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**यांसी**

**लिहून देणार:**
मे. डेल्टा सर्व्हिसेस,
शॉप न. जी-१२, श्रध्दा इमरल्ड,
गांधी नगर, अक्कलकोट रोड,
सोलापूर - ४१३००६
Registration No. 27BCYPK1206P1ZZ

लिहून देणार मे. डेल्टा सर्व्हिसेस, सोलापूर यांनी लिहून घेणार यांना टोनर रिफिलींग/टोनर दुरुस्तीची सेवा पुरविण्याबाबतचा मक्ता देण्यात आलेला आहे. याबाबतचा वार्षिक दर करारनामा खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

अटी व शर्ती:

१. **सदर वार्षिक दर कराराचा कालावधी दि. ०१/०७/२०२६ ते ३०/०६/२०२७ असा एक वर्षाकरिता राहील.**

२. लिहून देणार यांनी लिहून घेणार यांचे कडील प्रिंटरचे टोनर रिफिलींग व टोनर दुरुस्ती दर मान्य केल्याप्रमाणे आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे

| Sr. No. | Name of the Article | Quantity | Rate Per Qty with GST |
|---|---|---|---|
| 01 | Canon 2900 Toner Refilling | 120 gm. | ₹.243/- |
| 02 | HP LaserJet 1020 Toner Refilling | 120 gm. | ₹.243/- |
| 03 | HP LaserJet 1005 Toner Refilling | 80 gm. | ₹.243/- |
| 04 | Samsung ML 1640 Series | 80 gm. | ₹.220/- |
| 05 | Canon MF 244 dw | 80 gm. | ₹.243/- |
| 06 | Brother MFC B7551 DW | 120 gm | ₹.243/- |
| 07 | Blade Replacement | 01 Qty | ₹.142/- |
| 08 | Drum Replacement | 01 Qty | ₹.200/- |
| 09 | PCR Replacement | 01 Qty | ₹.120/- |
| 10 | Magnetic Rod Replacement | 01 Qty | ₹.135/- |

३. विद्यापीठातील विविध विभागाकडून टोनर रिफिलींग/दुरुस्तीसाठी लिहुन देणार यांना कळविल्यापासून जास्तीत जास्त सात दिवसामध्ये कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत विद्यापीठात येऊन प्रत्यक्ष जागेवर टोनर रिफिलींग/दुरुस्ती करुन द्यावी. अन्यथा प्रति दिवस रु.१००/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

४. लिहून देणार यांनी सादर केलेले देयक ७ दिवसात तपासणी करुन देयकाची रक्कम आदा करताना त्या मधून नियमानुसार सर्व करांची कपात करण्यात येईल.

५. सदर वार्षिक दर करारांतर्गत सुरक्षा ठेव म्हणून रक्कम रुपये १५,०००/- इतकी रक्कम आपणांस भरावी लागेल. त्यानंतरच कार्यारंभ आदेश देण्यात येईल. सदरची सुरक्षा ठेव रक्कम करारनाम्यातील कालावधी समाधानकारक पूर्ण झाल्यानंतर परत देण्याचे आहे. त्यावर कोणतेही व्याज मिळणार नाही.

६. पुरवठाधारकांना पुरवठा आदेश मिळाल्यापासून सात दिवसाच्या आत टोनर रिफिलिंग/दुरुस्ती न केल्यास पुन्हा तीन दिवसाच्या मुदतवाढीने पुरवठा आदेश देण्यात येईल. मुदतवाढीने दिलेल्या पुरवठा आदेशाच्या कालावधीमध्ये टोनर रिफिलिंग/दुरुस्ती न केल्यास अथवा काम समाधानकारक न झाल्यास आपल्या सोबत केलेला दरकरार रद्द करुन आपली सुरक्षा ठेव रक्कम जप्त करण्याबाबतच्या कार्यवाहीकरिता मा.कुलगुरु यांचेकडे सादर करण्यात येईल. त्यावर मा.कुलगुरु यांचे आदेशान्वये पुढील कार्यवाही करण्यात येईल.

७. टोनर रिफिलींग/दुरुस्तीसाठी देयक मंजूर दराप्रमाणे आदा करण्यात येईल व सदर दर कालावधीत कोणत्याही कारणास्तव दरवाढ मिळणार नाही.

८. उपरोक्त दरकरारातील टोनर रिफिलींग/दुरुस्ती व्यतिरिक्त इतर दुरुस्ती असल्यास त्याच्या खर्चाबाबत लिहून देणाऱ्यांनी संबंधित विभागास वर नमूद प्रमाणे लेखी कळवावे अथवा त्याचे अंदाजपत्रक द्यावे.

९. टोनर रिफिलींग/दुरुस्ती करावयाची असल्यास त्याच्या मंजूर दरापेक्षा जास्त खर्च होत असल्यास येणाऱ्या खर्चाबाबत लिहून देणाऱ्यांनी संबंधित विभागास लेखी कळवावे/दरपत्रक द्यावे.

१०. त्याचप्रमाणे लिहून देणार यांनी प्रस्तुत मक्त्याचा पोटमक्ता देण्याचे नाही. तसे आढळल्यास प्रस्तुतचा करारनामा रद्द करण्याचे अधिकार विद्यापीठास आहेत.

११. मक्तेदाराने दरपत्रके सादर करताना ज्या कंपनीचे टोनर, शाई, ब्लेड, ड्रम व इतर साहित्य संबंधी माहिती व दर नमूद केलेले आहे. त्या प्रमाणेच पुरवठा करण्याचे आहे. टोनर रिफिलिंगच्या शाईचा दर्जा व प्रमाण योग्य वापरुनच रिफिलिंग करावयाचे आहे. दर्जा अथवा प्रमाण कमी वापरल्यास व तसे लक्षात आल्यास आपणावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. सदर टोनर रिफिलिंग/दुरुस्ती स्व:खर्चाने पुरवठा करुन द्यावी लागेल.

१२. टोनर रिफिलींग/दुरुस्ती केल्यानंतर टोनर व प्रिंटरमध्ये काही दोष निर्माण झाल्यास त्याचे देयक आदा केले जाणार नाही.

१३. टोनर रिफिलींग/दुरुस्ती करताना लिहून देणार यांचेकडून प्रिंटर / त्यातील पार्टस् चे नुकसान झाल्यास त्याची भरपाई लिहून देणार यांनी करावयाची आहे.

१४. सदर करार मुदतीत कोणत्याही प्रकारे वाद उपस्थित झाल्यास प्रथम मा.कुलगुरु महोदय यांच्याकडे सोडविण्यात येईल व वाद न मिटल्यास ते Arbitration and Conciliation सोलापूर येथेच सोडविण्याचे राहील.

१५. वरील प्रमाणे अटी व शर्तीचा भंग लिहून देणार यांनी केल्यास सदरचा करार कोणतीही पूर्व कल्पना न देता रद्द करण्याचे व आवश्यक वाटल्यास सुरक्षा ठेव रक्कम जप्त करण्याचे अधिकार विद्यापीठास आहेत.

१६. मुदतीत व नमूद कालावधीत टोनर रिफिलींग/दुरुस्ती न केल्यास व इतर फर्मकडून सदर टोनरची रिफिलींग/दुरुस्ती करुन घ्यावी लागल्यास त्याबाबतचा खर्च लिहून देणार यांचेकडून वसूल करुन घेण्याचे अधिकार विद्यापीठास आहेत.

१७. दुरुस्ती वेळेत न केल्यास पुरवठादाराचा ठेका/दरकरार रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठास राहील व आवश्यक असल्यास पुरवठादाराची सुरक्षा ठेव रक्कम जप्त केली जाईल.

१८. दरकराराची मुदत वाढ किंवा कमी करण्याचे अधिकार मा. कुलगुरु यांना राहतील. त्यानुसार मा. कुलगुरू यांची मान्यता घेवुन मुदतवाढ/कमी केल्याचे फर्मला तसे लेखी स्वरूपात कळविण्यात येईल.

१९. प्रस्तुत विद्यापीठातील विविध संकुले व प्रशासकीय विभाग यांच्याकडे असणाऱ्या विविध प्रिंटरच्या टोनर रिफिलिंग व टोनर दुरुस्तीसाठी मागविण्यात आलेल्या दरपत्रकातील सुचना व अटी प्रस्तुत करारनामाचा भाग असून, त्याचे पालन करणे लिहून देणार यांच्यावर बंधनकारक राहील.

२०. प्रस्तुत करारनामा सोलापूर न्यायकक्षेच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

२१. वरील अटी व शर्ती मला/ आम्हाला मान्य आहेत व माझ्या/ आम्हा वर बंधनकारक आहेत.

२२. उपरोक्त दरकरार आज दि.०१/०७/२०२६ रोजी करण्यात आला.

लिहून देणार
मे. डेल्टा सर्विसेस, सोलापूर

साक्षीदार:-

१. (Pujari P.R.)
Asst. section officer

२. (Smt. Sonali A. Gaikwad)

लिहून घेणार

(डॉ. अतुल तानाजी लकडे)
प्र.कुलसचिव
पु.अ. हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर